# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
( महसूल शाखा )

---

वाचले:- १. मे. ए. व्ही. एस. रियल्टर्स, ग्राऊंड फ्लोर, योक आर्केड, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई- ४०० ०२८ यांचेकडील दि.१०/८/२०१७ चा अर्ज.
२. मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील कलम २९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. गौखनि-१०/१००९/प्र.क्र.३०९/ख, दि. ११/०२/२०१०
४. महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५.
५.परिरक्षण भूमापक, मुंबई शहर यांचेकडील स्थळपाहणी अहवाल दि. २३/८/२०१७

---

क्र.सीएसएलआर/मशा-२/आ.क्र.२६००७/प्र.क्र.१०९२/
माटुंगा/भूकर ४२३/१० प्लॉट नं.८८/गौ.ख.प./२०१७./329
दिनांक :- /०८/२०१७
31 AUG 2017

विषय : जमीन : मुंबई शहर
माटुंगा महसूल विभागातील भूकर क्रमांक ४२३/१० प्लॉट नं. ८८ या मिळकतीवर खोदकाम करुन गौणखनिज उत्खननास परवानगी मिळणेबाबत.

आदेश :-

मे. ए. व्ही. एस. रियल्टर्स, यांनी उपोद्घातातील १ प्रमाणे या कार्यालयास दि.१०/८/२०१७ रोजीचे अर्जाने **माटुंगा** महसूल विभागातील भूकर क्रमांक **४२३/१० प्लॉट नं.८८** मुंबई या मिळकतीमधून एकुण **४५० ब्रास** गौणखनिजे काढण्यास परवानगी मागितलेली आहे. अर्जदार यांनी सदर पत्रासोबत लागणारी कागदपत्रे जोडलेली आहे. तसेच त्यांनी **रक्कम रु. १,८०,५००/- चा भरणा Online ग्रास प्रणालीने, GRN No – MH००४६८६६४५२०१७१८E, दि.२१/८/२०१७ रोजीचे चलान द्वारे केलेला** आहे. अर्जदार यांनी अर्ज शुल्क र. रु.५००/- चा भरणा अनुज्ञप्ती शुल्काबरोबरच केलेला आहे.

सबब गौण खनिज काढण्यास सादर केलेल्या कागदपत्रास अनुसरुन मे. ए. व्ही. एस. रियल्टर्स, यांना वर नमूद जमिनीमधून खोदकाम करुन ४५० ब्रास गौण खनिज (मुरुम, दगड व माती काढणेस) उत्खननास मी श्री. बन्सी गवळी, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील नियम २९ व महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५ प्रमाणे मला प्राप्त अधिकारानुसार खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे.

१. सदरचे जमिनीचे खोदकाम करतांना लगतचे जमिनीवरील इमारतीला कोणताही धोका पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या बंधपत्राचे पालन करावे.
२. खोदकाम केल्यानंतर उत्खननाने निघालेली माती अगर इतर गौणखनिज कोणत्याही शासकीय जमिनीवर टाकण्यात येवू नये. उत्खनन केलेली माती ज्या जागेवर टाकणार आहेत, त्या जागेच्या मालकाची परवानगी घ्यावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांची परवानगी घ्यावी.
३. उत्खननाबाबत या आदेशापासून <u>दोन</u> महिन्याची मुदत देण्यात येत आहे.
४. मंजूर केलेल्या गौणखनिजापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

५. मुदतीत उत्खनन झाल्याचा अहवाल अर्जदाराने सादर करावा व त्याप्रमाणे या कार्यालयाचे प्रतिनिधिमार्फत प्रमाणित करावे.

६. उत्खनन करण्यास परवानगी दिलेली आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागेतून उत्खनन करु नये. तसे आढळल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

७. कांदळवनावर भराव केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुढील मुदतवाढ मिळणार नाही.

(बस्की गवळी) २९/८/२०१७
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :-

१. मे. ए. व्ही. एस. रियल्टर्स, ग्राऊंड फ्लोर, योक आर्केड, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई- ४०० ०२८

२. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहितीसाठी सादर.

३. श्री. सी. एफ. जयस्वार, अव्वल कारकून, महसूल शाखा

२/- आपणास यापूर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे या कार्यालयाचे पथकामार्फत वरचेवर स्थळपाहणी करुन परवानाधारक यांनी केलेल्या गौणखनिजांचे उत्खननाची मोजमापे घेऊन जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कार्यवाही करण्यात यावी.

31/08/2017

31 AUG 2017